**प्रेस नोट** **दिनांक २६/०३/२०१९**

## खडक पोलीस ठाणे,पुणे शहर

## गहाळ झालेल्या मोबाईल फोनचा तांत्रिकदृष्टया तपास करून मोबाईल फोन मालकास परत.

दि. २६.०३.२०१९ रोजी इसम नामे सिताराम गोरे वय ३० वर्षे, रा. हिंगणे-पुणे यांचा विवो कंपनीचा किंमत रूपये १५०००/- रूपयांचा मोबाईल फोन शुक्रवार पेठ भागात गहाळ झाला होता. सदर व्यक्ती त्याबाबत खडक पोलीस ठाणे येथे तक्रार देण्यासाठी आले होते. खडक पोलीस ठाणेकडील तपास पथकाचे कर्मचारी पोशि राकेश क्षीरसागर व महेश बारावकर यांनी गुगल या ऑनलाईन ॲपचा वापर सदर व्यक्तीचे मेल-आयडीवरून फाईंड माय डिव्हायस या पर्यायाचा वापर करून गहाळ झालेल्या विवो कंपनीचे मोबाईल फोनचे लोकेशन प्राप्त केले. सदर लोकेशनचा शोध घेवून त्याठिकाणी नमुद कर्मचारी यांनी तक्रारदार सिताराम गोरे यांचा गहाळ झालेला विवो कंपनीचा मोबाईल फोन शोधून तो त्याचे ताब्यात देण्यात आलेला आहे.

